www.attalmat.com

# अट्टल मत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष –19, अंक–21 ■छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 26 जानेवारी 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने –4

# महाठग मोतीराम थोरेने लाज सोडली...

छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

प्लॉट नं. १२७ सावरकर नगर एन-५ सिडको छत्रपती संभाजीनगर येथे कवलदीप दिलजितसिंग अरोरा यांच्या घरात नवीन भाडेकरू म्हणून दोन तरूण मुली (नाव बदलून) ज्योती व दिव्या या राहण्यासाठी आले आहेत. त्यातील ज्योतीने पोलिसांत तक्रार दिली आहे की, २३ जानेवारी २०२६ रोजी आम्ही आमच्या रूममध्ये झोपलो असताना पहाटे ४ वाजेच्या सुमारास खालच्या मजल्यावर राहणारे भाडेकरू मोतीराम थोरे हा जोरजोरात दरवाजा वाजू लागला व ज्योतीला म्हणाला की, मला तुला भेटायचे आहे. दार उघड असे म्हणून जोराजोराने दरवाजा ढकलू लागला. (नाव बदलून) ज्योती ने तिच्या मैत्रीणीला झोपेतून उठवले. तेव्हा तिच्या आवाजाने मोतीराम थोरे याने दरवाज्याला बाहेरून कडी लावली व तिसऱ्या मजल्यावर जावून आम्हाला येणाऱ्या सोलरच्या पाइपचा कॉक बंद केला व परत आमच्या रूमच्या समोर येवून दरवाज्याची कडी उघडली व खाली त्याच्या रूमम ध्ये निघून गेला. हे सर्व दोघ तरूणींनी त्यांच्या रूममध्ये ब सवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात हा सर्व प्रकार पाहिल्याचे त्यांनी सांगितले.

सकाळी १०.०० वा च्या सुमारास या दोघी मैत्रीणी त्यांच्या रूमच्या बाहेर आल्यावर सीसीटीव्ही कॅमेरा पाहत असताना तो त्यांना खाली लटकलेला दिसला म्हणून त्या काठीने सदर कॅमेरा सरळ करत असताना मोतीराम थोरे यांच्या पत्नी सुरेखा थोरे हिने या दोघांना शिवीगाळ करून तु आमचा कॅमेरा सरळ करू नको असे म्हणत असताना मोतीराम थोरे हा मला त्या तरूणींना पाहून अश्लील इशारे करू लागला. थोरे याच्या मुलाने या दोघं तरूणींना अश्लिल शिवीगाळ केली. (नाव बदलून) ज्योती ने सुरेखा थोरे, मोतीराम थोरे, त्यांचा मुलगा ओम थोरे यांच्या विरोधात कायदेशीर तक्रार केली असून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी असे नमूद केले आहे, पुढील तपास पो.हे. १२७८ भोसले हे करत आहे.

## स्वत:चे घर किरायाने देवून दुसऱ्याच्या घरावर कब्जा करणारा महाठग मोतीराम थोरे

महाठग मोतीराम थोरे याने स्वत:चे घर किरायाने देवून दुसऱ्याचे घर बळकावण्याच्या इराद्याने कब्जा करून राहत आहेत. माझ्या मागे सत्ताधाऱ्यांचा हात आहे. त्यामुळे मी पोलिस यंत्रणेसह कोणालाही मोजत नाही. मी तर शेर आहे. तर माझी पत्नी ही सव्वाशेर आहे. कोणीही आले तरी ती सर्वांना निपटून टाकते. त्यामुळे आम्ही दोघेही कोणालाही दाद देत नाही. आम्ही ज्या घरावर कब्जा केला आहे त्यातून आम्हाला कोणीही काढू शकत नाही. दोन वर्षांपासून किराया दिला नाही तरी कोणत्याही यंत्रणेची आम्हाला काढण्याची हिंमत नाही. अरोरा हे आमचे घर मालक आहेत. त्यांना तर मी छळ करून करून तंग केले आहे. त्यांनी कितीही भाडेकरू ठेवले तरी त्यांना मी पळवून लावणार आहे. असे थोरे सांगत फिरत आहे.

## कितीही एफआयआर करा आम्ही कुणाली भीक घालत नाही – थोरे दाम्पत्य

पोलिसांत ही त्याची तक्रार केली आहे. मी आतापर्यंत ५ एफआयआर व १० एन.सी. ची नोंद केली आहे, दोन वर्षांपासून मी येथे घरभाडे न देता राहत आहे. पोलिसांत माझ्या विरोधात तक्रार केल्या आहेत. तरी पोलिस माझे काही करू शकले नाही. पोलिस प्रशासनालाही ही मी खिशात ठेवतो. मोतीराम थोरे विकृत बुद्धीचा असून त्यांच्या वागण्यातून कधीच सरळपणा निघत सदैव कुडघोरी करणे, त्रास देणे सतत करत असल्याचे तो स्वत: बडबड करत फिरत आहे.



## गुंड प्रवृत्तीचा मोतीराम थोरे हा घरमालक अरोरा यांच्या कुटुंबालाच देतो जीवे मारण्याची धमकी...

### ७५ वर्षीय वृद्ध घरमालकिणीला घरात कोंडले; शिवीगाळ, धमक्या आणि सीसीटीव्हींची तोडफोड

छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

कवलदीप दिलजितसिंग अरोरा यांचा मुलगा कामाच्या निमित्ताने पुणे येथे राहतो. कवलदीप अरोरा त्यांची सूनब ाई वरिंदर सुमीत अरोरा हे दोघेही छत्रपती संभाजीनगर येथे एन-५ येथील सावकरनगर येथे राहतात. सुरूवातीला दिलजितसिंग अरोरा यांनी मोतीराम नामदेव थोरे व सुरेखा मोतीराम थोरे यांना भाडेतत्वावर हे घर दिले होते. परंतु सुरूवातीला काही दिवस चांगल्या राहिल्यानंतर यांची नियत फिरली व मालमत्तेवर डोळा ठेवू लागले. दिलजितसिंग अरोरा यांच्यावरही त्यांनी अनेकदा प्राणघातक हल्ले केले परंतु ते सहन करत केले. नेहमीच दादागिरी अश्लील शिवीगाळ करणे हे तर त्यांच्या नित्याचेच झाले.

भाडे करार संपला तरी करार करण्यास विरोध करू लागले. भाडे मागायला गेले की, मारण्याची धमकी द्यायचे वयोवृद्ध असल्यामुळे काही हिंमत होत नव्हती. एक दिवस तर त्यांनी दिलजितसिंग अरोरा यांना पाण्याच्या हौदात बुडवून जीव घेतला व हृदयविकाराचे कारण सांगितले, असा आरोप कवलदीप अरोरा व त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे.

मोतीराम थोरे हा गेंड्याच्या कातडीचा माणूस आहे, अशी चर्चा सध्या एन-५ परिसरात सुरू आहे. किती त्रास द्यावा याचीही मर्यादा असते. ज्यांचे घर आहे. त्यांनाच जीवे मारण्याच्या धमक्या देतो, राहतो तर राहतो पुन्हा शिरजोरी करतो. घर मालकालाच घरात घरण्यास मनाई करतो. यात त्याची पत्नी सुरेखा थोरे ही पण काही कमी नाही. नेहमीच जीण्यावरील पायऱ्यावर कधी तेल मिश्रीत पाणी टाकते. तर कधी निरमा पावडर असलेले पाणी टाकते. जेणे करून पायऱ्यावरून येणारा कोणताही व्यक्ती पडला पाहिजे व त्याला जखम झाले पाहिजे असे अनेक उपक्रम येथील कमी बुद्धी असलेले दाम्पत्य करीत असतात, अशी माहिती घर मालक कवलदीप अरोरा व त्यांची सूनबाई वरिंदर सुमीत अरोरा यांनी दिली. थोरे दाम्पत्य पोलिसांना सुद्धा दमदाटी करतात व विचारतात तुम्ही कोण? येथे तुमचे काय काम? मी माझ निपटून घेईल... यांच्यात इतकी मग्रुरी आली तरी कुठून. ११ महिन्यांचा भाडेकराराचा बॉण्ड केला आणि गेल्या अनेक वर्षांपासून राहत आहे. दोन वर्षांपासून तर भाडे देण्याचे नाव घेत नाही. संपूर्ण मालमत्तेचा वापर करतो आणि स्वत:ला या मालमत्तेचा मालक समजतो.

"तु आमची तक्रार करते काय? तुला व तुझ्या सासूला तुझ्या सासऱ्याजवळ पाठवून देवू अशा प्रकारे मारण्याची धमकी थोरे दाम्पत्य आमच्या कुटुंबाला देत आहेत. माझे कोणीही काही करू शकत नाही. कायदाला मी मोजत नाही. – मोतीराम थोरे

•लोखंडी रॉडने सीसीटीव्हीची तोडफोड

२५ डिसेंबर रोजी त्याने या सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तोडफोड केली आहे. लोखंडी रॉडने सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तोडफोड केली आहे. याचे सर्व पुरावे वरिंदर सुमीत अरोरा यांच्याकडे असून ते अट्टलमतकडे देण्यात आले आहे.

#### ४ एफआरआय व ९ एन.सी.

पोलिसांत ही त्याची तक्रार केली आहे. मी आतापर्यंत ४ एफआरआय व ९ एन.सी. ची नोंद केली आहे, कवलदीप अरोरा यांनी सिडको पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिस निरीक्षक अतुल येरमे यांच्या आदेशाने आरोपी दाम्पत्याविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

#### ११२ या क्रमांकावर फोन लावला तरी माझे काही होवू शकत नाही

११२ या क्रमांकावर अनेकदा थोरे यांची अरोरा यांनी तक्रार केली परंतु तरीही यांच्यात काहीही सुधारणा होत नाही. वारंवार त्रास देत असतात. गाडी आली तरी माझे काही होवू शकत नाही व काहीही करू शकत नाही. समज देतील याच्यावर ते काय करणार असे थोरे सांगतो. त्याला कायदाचा ही धाक राहिलेला नाही. कायदालाही मोतीराम थोरे मोजत नाही. कायदा देखील धाब्यावर बसवला आहे. असे तो म्हणतो.

#### २५ डिसेंबरची धक्कादायक घटना

छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

एन-५ परिसरातील सावरकरनगर येथे भाडेकरू दाम्पत्याने अमानुष कृत्य करत ७५ वर्षीय वृद्ध घरम ालकिणीला घरात कोंडून ठेवत दहशत निर्माण केल्याची धक्कादायक घटना २५ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे ३ वाजता घडली. या प्रकरणी सिडको पोलिसांनी मोतीराम नामदेव थोरे व सुरेखा मोतीराम थोरे या भाडेकरू दाम्पत्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

कवलदीप दिलजितसिंग अरोरा (७५, रा. सावरकरनगर, एन-५) यांच्या घरात आरोपी दाम्पत्य काही दिवसांपासून भाडेतत्त्वावर राहत आहे. २५ डिसेंबर रोजी दुपारी कवलदीप अरोरा एकट्याच घरात असताना आरोपींनी त्यांच्या घरासमोर येऊन मोठ्या आवाजात अश्लील शिवीगाळ सुरू केली. यानंतर दरवाजाला लाथा मारून दहशत माजवण्यात आली. भीतीमुळे वृद्ध महिलेने दरवाजा उघडला नाही.


यामुळे चिडलेल्या आरोपींनी घराचा मुख्य दरवाजा बाहेरून बंद करून कडी लावली. त्यामुळे वृद्ध महिला बराच वेळ घरात एकट्याच कोंडल्या गेल्या. या काळात आरोपींनी त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या देत सतत शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद आहे. घरात राहणाऱ्या दुसऱ्या महिलेने प्रकार लक्षात येताच धाव घेऊन दरवाजाची कडी उघडली व पोलिसांना माहिती दिली. त्यावेळी सुरेखा थोरे हिने त्या महिलेलाही शिवीगाळ करत धमकावले.

दरम्यान, कवलदीप अरोरा यांचा केअरटेकर ओम गुंजाळ घटनास्थळी पोहोचला असता आरोपींनी त्यालाही आत येण्यास मज्जाव केला. इतकेच नव्हे तर जिन्याच्या गेटला कुलूप लावून संपूर्ण इमारतीत दहशत पसरवली. त्यानंतर घरात बसवण्यात आलेल्या सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तोडफोड करण्यात आली.

पोलिस घटनास्थळी दाखल होताच दोन्ही आरोपी शांत झाले. सायंकाळी कवलदीप अरोरा यांनी सिडको पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिस निरीक्षक अतुल येरमे यांच्या आदेशाने आरोपी दाम्पत्याविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## एफआयआरने माझे काही होत नाही– थोरे

किती ही एफआयआर केले तरी मी त्रास देणे थांब वू शकत नाही. मी हे घर बळकावण्यासाठी येथे जो देखील भाडेकरू माझ्या व्यतीरिक्त येईल त्याला मी त्रास देवून पळवून लावेल. प्रसंगी जीव देखील घेण्याचा प्रयत्न करेल. परंतु अरोरांचे घर मी बळकावण्याचा प्रयत्न सतत सोडणार नाही. माझे कोणीही काहीही करू शकत नाही. असे सुरेखा थोरे संपूर्ण परिसरात सांगत फिरत आहे. हातात काठी घेवून दुसऱ्या भाडेकरूवर हल्ला करण्यासाठी जिन्यावर जात असल्याचे सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसत आहे.




# सहाय्यक दुय्यम निबंधक सय्यद रसूल बोगस रजिस्ट्रीतून लाखो रूपये करतो वसूल

## भिमशक्ती सामाजिक संघटनेचे महिला जिल्हा अध्यक्षा मीनाताई काकडे यांच्यावतीने चौकशी करण्याचे निवेदन

छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यात कार्यरत असताना सहाय्यक दुय्यम निबंधक सय्यद रसूल यांनी केलेल्या बोगस एन.ए. चालान घोटाळा, तसेच तुकडाबंदी कायद्याचे उल्लंघन करुन बोगस दस्त नोंदणी प्रकरणी त्यांची चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्यात यावे तसेच त्यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात यावे. यासंदर्भात भिमशक्ती सामाजिक संघटनेच्या महिला जिल्हा अध्यक्षा मीनाताई काकडे यांच्या वतीने निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय येथे देण्यात आले आहे.**



### गंगापूर तालुक्यातील नोंदणी कार्यालयाचा कथित घोटाळा

सध्या ते छत्रपती संभाजीनगर तालुक्यात कार्यरत असलेले सहाय्यक दुय्यम निबंधक सय्यद रसूल यांनी सन २०२१ मध्ये जवळपास २३ दस्त नोंदणी हे नियमबाह्य केल्याप्रकरणी त्यांच्यावर तुकडाबंदी कायद्याचे उल्लंघन केल्या प्रकरणी दोषी ठरले होते. त्यावेळेस आपल्या कार्यालयातील संबंधीत अधिकाऱ्याने त्यांच्यावर शिस्त भंगाची कार्यवाही सुद्धा केली होती. त्यानंतर वर्ष २०२२ मध्ये त्यांच्यावर ६५ लाख ८४ हजार ४४५ रुपये एवढा शासनाचा महसूल बुडवल्या प्रकरणी ते दोषी ठरले होते, परंतू त्यानंतरही त्यांचे कामे हे नियमबाह्य पद्धतीने चालू आहे. २०२१ मध्ये त्यांनी केलेल्या बेकायदेशीर कामाची चौकशी केली असता ती चौकशी थातूर मातूर केली असून संघटनेकडे असे अनेक पुरावे आहे की या चौकशीच्या व्यतिरिक्त त्यांनी केलेल्या चालान घोटाळ्यामध्ये सदरील बोगस चलनाचे पैसे कसे वसूल केले व ते कोन्ही शासनाला भरले व कशा पद्धतीने भरले त्यामध्ये संबंधित लिहुन घेणार व लिहुन देणार यांना त्या संबंधी नोटीस सुद्धा पाठविल्या नाही आणि त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे सुद्धा दाखल झाले नाही. या प्रकरणी सुद्धा सविस्तर तपास करुन सखोल चौकशी करण्यात यावी.

सय्यद रसूल यांनी ऑगस्ट २०२५ मध्ये सोयगाव येथे दोन दिवस प्रभारी चार्ज घेतला होता त्यावेळेस त्यांनी जवळपास ८-९ दस्त नोंदणी नियम बाहय पध्दतीने करून कायद्यातील पळवाटा काढून आपल्या आधीकाराचा दुरुपयोग केला.

त्याअगोदर गंगापूर येथे कार्यरत असताना त्यांनी १५ सप्टेंबर २०२४ रोजी एन.ए. नसलेली जमीन अकृषिक दाखवली त्यामुळे शासनाचा जवळपास ३९,००,०००/-एकोणचाळीस लाख रुपयांचा महसूल बुडवला यामध्ये रसूल यांनी नेहमी प्रमाणे कायद्याची पळवाट काढून या कामामध्ये काही चूकीचे नाही असे वक्तव्य करत आहे.

याअगोदर सय्यद रसूल यांनी प्लॉट व्यावसायीकांना हाताशी धरून जिल्हाधीकारी कार्यालयाची बनावट एन.ए.ची ऑर्डर तयार करून बोगस पद्धतीने दस्त नोंदणी केल्या आहे. आपल्या आर्थकि स्वार्थापोटी सय्यद रसूल यांनी नियम धाब्यावर ठेवून आपल्या पदाचा दुरुपयोग करून शासनाची फसवणूक आणि महसूल बुडवण्याचे काम सय्यद रसूल हे करत आहे. या अगोदरही सय्यद रसूल यांनी २०२१ मध्ये २३ दस्त नोंदणी हे बेकायदेशीर केल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही देखील झाली आहे. संघटनेच्या वतीने दि. २४/१०/२०२४ रोजी आपल्या कार्यालयाला पत्रव्यवहार तसेच तक्रार केली होती. परंतू त्या तक्रारीवर रितसर कुठल्याही प्रकारची चौकशी अथवा कार्यवाही झाली नाही म्हणून येत्या १५ दिवसात या अर्जावर कार्यवाही न झाल्यास संघटनेच्या वतीने आपल्या कार्यालयासमोर लोकशाही पद्धतीने बेमुदत उपोषण करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

## या आहेत सय्यद रसूल यांनी नियमबाह्य दस्त केलेल्या नोंदण्या

सय्यद रसूल यांनी २०२१ ते २०२४ दरम्यान बोगस एन.ए. द्वारे दस्त नोंदणरी केल्या आहेत आणि खुप मोठ्या प्रमाणात नियमबाह्य दस्त नोंदणी सय्यद रसूल यांनी केल्या आहे. त्यामध्ये दस्त क्र. •१) ३७९१/२१/का.क्र.२, •२)३७७९/२१/का.क्र.२. क्र.२, •३)६६६०/२१/का.क्र.२, • ४)६७०८/२३/ गंगापूर, •५)३७९२/२१/का.क्र.२, •६)६६५९/२१/का.क्र.२, •७)६६५८/२१/का.क्र.२, •८)६६५६/२१/का.क्र.२, •९)६६५७/२१/का.क्र.२, •१०) ३७९०/२१/का.•११)३७६४/२१/का.क्र.२, •१२)३७६५/२१/का.क्र.२, •१३)७४४/२४/गंगापूर, •१४)६५६/२४/गंगापूर, •१५) ८३६२/२३/गंगापूर अशा प्रकारच्या आहेत.

# भारताच्या विविधतेतून एकता वैशिष्ट्यास मानवंदना!

२६ जानेवारीचा हा राष्ट्रीय समारंभ असल्यामुळे या दिवशी सार्वजनिक सुट्टी असते. दि.२६ जानेवारी १९५० रोजी नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या भारत देशाने संविधान अंमलात आणून लोकशाहीतील एका नव्या पर्वाची सुरुवात केली होती. प्रजासत्ताक दिवस भारतातील तीन राष्ट्रीय सुट्ट्यांपैकी एक आहे. अन्य दोन- स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट व गांधी जयंती २ ऑक्टोबर हे आहेत. या दिवशी भारताची राजधानी नवी दिल्ली येथे एक मोठी परेड- संचलन राजपथ मार्गावरून निघते. भारतीय प्रजासत्ताक दिवस हा भारताच्या प्रजासत्ताकात दरवर्षी २६ जानेवारी रोजी पाळला जाणारा राष्ट्रीय सणाचा दिवस आहे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान समितीने दि.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकारले व दि.२६ जानेवारी १९५०पासून ते अंमलात आणले गेले. पं.जवाहरलाल नेहरू यांनी दि.३१ डिसेंबर १९२९ रोजी लाहोरजवळ रावी नदीच्या काठी तिरंगा फडकावून पूर्ण स्वराज्याची- स्वातंत्र्याची घोषणा केली होती. त्याची आठवण म्हणून २६ जानेवारी हा दिवस राज्यघटना अंमलात आणण्यासाठी निवडण्यात आला. या दिवशी देशभरात भारताच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण होऊन त्याला मानवंदना दिली जाते, राष्ट्रगीत म्हटले जाते आणि आदर व्यक्त केला जातो. हा दिवस आपल्या देशातील सुवर्णदिन आहे. या दिवसाची प्राप्ती हजारो देशभक्तांच्या बलिदानातून झाली होती. या दिवशी शाळा, महाविद्यालय शासकीय कार्यालय यांमध्ये विविध कार्यक्रमांसह भाषणे आयोजित केली जातात. संविधान प्रास्ताविकेचे मोठ्याने वाचन केले जाते. भारताला दीडशे वर्षांहून अधिक कालावधीतील ब्रिटीश राजवटीपासून दि.१५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. यामागे भारताचा स्वातंत्र्यलढा आणि त्यातील म.गांधींच्या अहिंसा पद्धतीचा मोठा हातभार आहे. तेव्हा स्वतंत्र भारताला स्वतःचे संविधान नव्हते. भारताचे कायदे हे मात्र भारतीय राज्यशासनाच्या सन १९३५ सालच्या कायद्यावर- कलमावर आधारित होते. दि.२९ ऑगस्ट १९४७ रोजी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसुदा समिती स्थापना केली गेली. या समितीने संविधानाचा मसुदा तयार करून तो सभेपुढे दि.४ नोव्हेंबर १९४७ रोजी सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवसांसाठी खुला केला होता. तब्बल २ वर्ष ११ महिने आणि १८ दिवसांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर समितीने हा मसुदा अंतिम केला. बरेचसे विचारविमर्श आणि सुधारणा केल्यानंतर समितीच्या ३०८ सदस्यांनी दोन हस्तलिखित प्रती- हिंदी आणि इंग्रजी या दि.२४ जानेवारी १९५० रोजी स्वाक्षरांकित केल्या. दोन दिवसानंतर हे भारताचे संविधान संपूर्ण राष्ट्रासाठी लागू करण्यात आले. म्हणून भारतीय संविधानाच्या निमित्ताने हा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात येऊ लागला.

दरवर्षी २६ जानेवारी रोजी भारताच्या राजधानीत म्हणजे नवी दिल्ली येथे एक मोठे संचलन आयोजित केले जाते. हे संचलन रायसीना हिलपासून राष्ट्रपती भवनापर्यंत राजपथ मार्गाद्वारे जाते. संचलनाच्या अगोदर अनाम सैनिकांसाठी बनवले गेलेले स्मारक व अमर जवान ज्योती येथे भारताचे पंतप्रधान पुष्पचक्र अर्पण करतात. भारतासाठी आपले प्राणार्पण करणाऱ्या वीर सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यात येते. त्यानंतर पंतप्रधान राजपथाच्या मुख्य मंचावर जातात व आलेल्या पाहुण्यांना भेटतात. तेवढ्यात प्रमुख पाहुण्यांसोबत राष्ट्रपतींचे आगमन होते. राष्ट्रगीत सुरू होताच राष्ट्रपती ध्वजारोहण करतात आणि २१ तोफांची सलामी दिली जाते. त्यानंतर देशासाठी शौर्य गाजवलेल्या सैनिकांना राष्ट्रपतींच्या हस्ते अशोकचक्र आणि कीर्तिचक्र हे मुख्य पुरस्कार देण्यात येतात. राष्ट्रीय शौर्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेली देशातील शूर बालके सजवलेल्या हत्तीवरून किंवा वाहनावरून या संचलनात सहभागी होतात. प्रमुख पाहुणे म्हणून परराष्ट्रीय राष्ट्राध्यक्षांना निमंत्रण दिले जाते. भारतीय फौजा- नौदल, पायदल, वायुसेना यांचे वेगवेगळे सेनाविभाग, घोडदळ, पायदळ, तोफखाना आणि इतर अद्ययावत शस्त्रे-क्षेपणास्त्रे जसे- पृथ्वी, अग्नी, रणगाडे समवेत संचलन करतात. भारताचे राष्ट्रपती या फौजांची मानवंदना स्वीकारतात. भारताच्या विविधतेतून एकता या वैशिष्ट्याला ही मानवंदना असते. या संचलनाच्या सादरीकरणाची पूर्वतयारी विशेष काळजीपूर्वक व शिस्तीने केली जाते, इतके या संचलनाचे महत्त्व आहे. नवी दिल्ली येथे होणाऱ्या संचलनाप्रमाणेच भारतातील सर्व राज्यांतही एकेक संचलन होते. प्रत्येक राज्यात त्या त्या राज्याचे राज्यपाल फौजांची मानवंदना स्वीकारतात. शेवटी बीटिंग रिट्रीट ऱ्या कार्यक्रमाने प्रजासत्ताक दिन सोहळ्याची सांगता केली जाते. प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देण्यासाठी देशभक्तीपर गीतांच्या ओळी, तिरंगा ध्वज आदी संकल्पनांचा कल्पकतेने वापर करून परस्परांना शुभेच्छा दिल्या जातात. देशाभिमान मनात टिकून राहण्यासाठी भारतीय नागरिक अशा शुभेच्छा एकमेकांना देऊन परस्परांमधील ऐक्य टिकवून ठेवण्याचे आवाहनही केले जाते.

# प्रजासत्ताक दिनः अर्थव्यवस्था वाढली; पण प्रजासत्ताक बळकट झालं का?

२६ जानेवारी हा भारतीय प्रजासत्ताकाचा गौरवशाली दिवस आहे. या दिवशी भारताने स्वतःला केवळ स्वातंत्र्यप्राप्त राष्ट्र म्हणून नव्हे, तर संविधानाच्या आधारे चालणारे लोकशाही प्रजासत्ताक म्हणून जगासमोर उभे केले. भारतीय संविधान घडविणाऱ्या घटनासमितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद आणि मसुदा समितीचे अध्यक्ष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली संविधानाची निर्मिती झाली. के. एम. मुन्शी, अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, गोपाळस्वामी अयंगार यांसारख्या विद्वान सदस्यांनी भारतीय समाजाची विविधता, आर्थिक वास्तव आणि भविष्यातील आव्हाने लक्षात घेऊन हे संविधान घडवले. त्यामुळेच भारतीय संविधान हे केवळ कायद्यांचे संकलन न राहता सामाजिक, आर्थिक व मानवी विकासाचा दिशादर्शक ठरले आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने हा लेख कोणतेही नकारात्मक किंवा टीकात्मक परीक्षण करण्यासाठी नव्हे, तर प्रजासत्ताक भारत झाल्यानंतर आजपर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कोणते मोठे बदल झाले, त्या बदलांची दिशा काय होती आणि त्यांनी देशाला अपेक्षित प्रगतीकडे कसे नेलेङ्गयाचा साधारण, वस्तुनिष्ठ आणि माहितीपर आढावा घेण्यासाठी लिहीत आहोत. स्वातंत्र्यानंतर भारतासमोर सर्वांत मोठे आव्हान होते ते आर्थिक पुनर्बांधणीचे. देश शेतीप्रधान होता, औद्योगिक पाया मर्यादित होता आणि संसाधने कमी होती. या पार्श्वभूमीवर नियोजन आयोगाची स्थापना करून पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारण्यात आला. शेती, सिंचन, धरणे, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, शिक्षणसंस्था आणि मूलभूत पायाभूत सुविधा उभारण्यावर भर देण्यात आला. या टप्प्यात भारतीय अर्थव्यवस्थेला स्थैर्य आणि दिशा मिळाली. १९९१ नंतर भारतीय अर्थव्यवस्थेने एक महत्त्वाचा टप्पा गाठला. उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण या धोरणांमुळे भारत जागतिक अर्थव्यवस्थेशी अधिक प्रभावीपणे जोडला गेला. खासगी उद्योगांना चालना मिळाली, परकीय गुंतवणूक वाढली आणि सेवा क्षेत्रङ्गविशेषतः माहिती-तंत्रज्ञानङ्गवेगाने विस्तारले. भारताने जागतिक पातळीवर एक विश्वासार्ह आर्थिक शक्ती म्हणून ओळख निर्माण केली.

एकविसाव्या शतकात भारतीय अर्थव्यवस्थेत आणखी लक्षणीय बदल झाले. बँकिंग व्यवस्था अधिक सक्षम झाली, भांडवली बाजार विस्तारला, विमा व वित्तीय संस्था म जबूत झाल्या. ऋडढसारख्या करसुधारणांमुळे करप्रणालीत सुलभता आणि पारदर्शकता आली. डिजिटल व्यवहार, णझख, ऑनलाइन सेवा यांमुळे अर्थव्यवस्था अधिक औपचारिक आणि समावेशक होण्याच्या दिशेने वाटचाल करू लागली. रस्ते, महामार्ग, रेल्वे, बंदरे, विमानतळ, ऊर्जा आणि दळणवळण या क्षेत्रांतील पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक झाली.

आज भारत जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक मानला जातो. ऋऊझ वाढ, स्टार्टअप संस्कृतीचा उदय, नवउद्योजकांना मिळणाऱ्या संधी, 'आत्मनिर्भर भारत'सारख्या संकल्पनाङ्गया सर्व गोष्टी भारतीय अर्थव्यवस्थेच्या बळकटीकडे निर्देश करतात. भारत उत्पादन, सेवा, तंत्रज्ञान आणि डिजिटल नवकल्पनांच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर आपली भूमिका बजावत आहे.

मात्र भारतीय संविधानाने आर्थिक विकासाची कल्पना केवळ आकड्यांपुरती मर्यादित ठेवलेली नाही. समता, सामाजिक न्याय आणि संधींचे सम ान वाटप हे प्रजासत्ताकाचे मूलभूत मूल्य आहेत. म्हणूनच आर्थिक वाढीबरोबर मानवी विकास, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक सुरक्षितता यांचा विचार करणे आवश्यक ठरते. भारतीय अर्थव्यवस्थेने अनेक क्षेत्रांत प्रगती केली असली, तरी ही प्रगती सर्व घटकांपर्यंत समान प्रमाणात पोहोचली आहे का, हा प्रश्न आत्म परीक्षणासाठी महत्त्वाचा आहे.

शेती, लघुउद्योग, ग्रामीण अर्थव्यवस्था, कौशल्यविकास आणि रोजगारनिर्मिती यांवर सातत्याने लक्ष देणे गरजेचे आहे. शिक्षण व आरोग्य क्षेत्रात गुंतवणूक वाढल्यास आर्थिक वाढ अधिक टिकाऊ आणि समावेशक होऊ शकते. ऋऊझ आणि मानवी विकास निर्देशांक यांतील सुसंगती वाढवणे हेच प्रजासत्ताकाच्या बळकटीचे लक्षण ठरेल.

प्रजासत्ताक दिन हा केवळ भूतकाळाचा गौरव करण्याचा दिवस नाही; तो भविष्यासाठी दिशा ठरवण्याचा दिवस आहे. अर्थव्यवस्था ङ्गम ोठीङ्ग होणे ही निश्चितच अभिमानाची बाब आहे; पण ती समावेशक होणे हे प्रजासत्ताकासाठी अधिक महत्त्वाचे आहे. आर्थिक धोरणे आणि घटनात्मक मूल्ये यांतील सुसंवाद जितका मजबूत होईल, तितके प्रजासत्ताक अधिक सुदृढ होईल.

आजच्या शुभ दिवशी भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रवासाकडे सकारात्मक नजरेने पाहताना, पुढील वाटचाल अधिक समताधिष्ठित, रोजगारकेंद्रित, शिक्षण व आरोग्याला प्राधान्य देणारी असावी, अशी अपेक्षा व्यक्त करणेच प्रजासत्ताक दिनाचे खरे औचित्य ठरते. तेव्हाच आपण आत्मविश्वासाने म्हणू शकू कीङ्ग अर्थव्यवस्था वाढली आहे आणि त्या बरोबरच प्रजासत्ताकही बळकट होत आहे.

**- डॉ. भारत कऱ्हाड,**
प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली,
जिल्हा रत्नागिरी.

# ज्ञान संदीप शिक्षण संस्थेत ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल डॉ. आंबेडकर नगर सिडको एन -७, छत्रपती संभाजी नगर, येथे भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रमुख संस्थापक अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे होते. प्रमुख पाहुणे म्हणून वार्डाच्या नगरसेविका भारतीताई महेंद्र सोनवणे, युवा नेते महेंद्र सोनवणे, संस्थेच्या सचिव संगीताताई खिल्लारे तसेच हायस्कूलचे मुख्याध्यापक संदीप सोनवणे उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिनानिमित्त सकाळपासूनच उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर नगर, फुलेनगर, गौतम नगर व जाधववाडी या परिसरातून लेझीम पथकासह भव्य प्रभातफेरी काढत परिसर देशभक्तीच्या घोषणांनी दणाणून सोडला. यावेळी विद्यार्थ्यांनी लेझीम सोबत डंबेल्स कवायत व रिंग कवायत यांचेही शिस्तबद्ध आणि आकर्षक सादरीकरण केले. शाळेच्या क्रीडांगणावर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान यांच्या प्रतिमेचे पूजन सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर नगरसेविका भारती सोनवणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीतांवर सुंदर नृत्य सादर केले. तसेच विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषांमध्ये प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व आणि भारतीय संविधानाविषयी माहिती प्रभावीपणे मांडली.

प्रजासत्ताक दिनाच्या औचित्य साधून शाळेत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

युवा नेते महेंद्र सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. संस्थेचे अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, भारतीय संविधान हे देशाचे आधारस्तंभ असून प्रत्येक नागरिकाने हक्कांसोबत कर्तव्यांची जाणीव ठेवली पाहिजे. त्यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रप्रेम ही मूल्ये अंगीकारण्याचे आवाहन केले. ङ्गशिक्षण हेच खरे सामर्थ्य आहे. शिक्षणाच्या जोरावरच तुम्ही स्वतःचे, कुटुंबाचे आणि देशाचे भविष्य उज्ज्वल करू शकता,ङ्ग असे ते म्हणाले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजहितासाठी कार्य करण्याचा संदेश त्यांनी दिला. संविधानाने दिलेल्या समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांचे पालन करणे हीच खरी प्रजासत्ताक दिनाची शिकवण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यात सुनील चौधरी, संजय चौधरी, साहेबराव शिंदे, विजय पाटील, नजमा शेख, वैशाली बागुल व कर्मचारी घोरपडे यांचा समावेश होता. कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन साहेबराव शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनी मानले.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीचा आयुक्त दिनेश वाघमारे यांच्याकडून आढावा

**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)**

विभागातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, लातूर आणि धाराशिव या चार जिल्ह्यांत जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूका ५ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार असून ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हानिहाय तयारीचा आढावा आज राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी घेतला.

विभागात करण्यात आलेल्या निवडणुकांच्या तयारीबाबत समाधान व्यक्त करून मतदान प्रक्रिया निर्भय वातावरणात पार पडेल आणि मतदानाच्या टक्केवारीत आणखी वाढ होईल, असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर त्यांनी मतदारांमध्ये मतदान करण्याविषयी आणखी म ोठ्याप्रमाणात जनजागृती करण्याच्या सुचनाही सर्व प्रशासकीय यंत्रणांना दिल्या.

येथील विभागीय आयुक्त कार्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीस विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, राज्य निवडणूक आयोगाचे उपसचिव सुर्या कृष्णमुर्ती, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, परभणीचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर-घुगे, धाराशिवचे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस अधीक्षक डॉ.विनय राठोड, परभणीचे पोलीस अधीक्षक विरेंद्रसिंह परदेशी, धाराशिवच्या पोलीस अधीक्षक रितू खोकर प्रत्यक्ष उपस्थित होते. तर नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, लातूर पोलीस अधीक्षक अमोल तांबे व सागर पाटील सहाय्यक पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) महाराष्ट्र राज्य, मुंबई हे दुरदृष्यप्रणालीव्दारे उपस्थित होते.

मतदानाविषयी जागृती व्हावी व मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात राबविण्यात




येत असलेल्या मतदार जनजागृती(स्वीप) उपक्रमांचे श्री. वाघमारे यांनी कौतुक करत इतर जिल्ह्यांनीही मतदार जनजागृती उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्याचेही निर्देश दिले. तसेच मतदान करण्याच्या प्रक्रियेविषयी मतदारांमध्ये विविध प्रसिद्धी माध्यमांतून जनजागृती करावी, वृध्द(वय ८० वर्षावरील), गरोदर महिला, दिव्यांग व्यक्ती यांना मतदान करणे सोयीचे होण्याच्या दृष्टीने उपाय योजना करण्यात याव्यात.

मतदार याद्यांतील दुबार मतदारसंख्या कमी करण्याच्या दृष्टीने दुबार नाव नोंदणी असलेल्या मतदारांकडून संमतीपत्रे भरून घेण्याचे काम गांभीर्याने करावे. त्याचबरोबर आचारसंहिता काळात प्रशासनाने केलेल्या कारवाईसही विविध म ाध्यमांव्दारे प्रसिद्धी देण्याच्या सूचना श्री. वाघमारे यांनी यावेळी दिल्या.

राज्य निवडणूक आयोग २०१० पासून मतदानावेळी मार्कर पेनची शाई वापरत आहे. परंतू यावेळी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी लोकसभा, विधानसभा निवडणूकीप्रमाणे 'म्हैसूर शाईचा' वापर करण्यात येणार असल्याचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक प्रक्रिया भयमुक्त व सुरक्षितरित्या पार पाडण्याच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषद व पंचायत समि ती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी मतदारांच्या प्रमाणात पुरेसे मतदान केंद्रे, इव्हिएम मशीनची उपलब्धता, मतदान केंद्रावर मतदान अधिकारी व कर्मचारी यांची व्यवस्था, मतदान प्रक्रियेतील अधिकारी व कर्मचारी यांचे आवश्यक प्रशिक्षण देण्याची कार्यवाही, स्ट्राँगरूमची व्यवस्था व सुरक्षा करण्यात आली असल्याचे सांगितले. तसेच मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविले जात आहे, याबाबत संगणकिय सादरीकरण केले.

मतदार यांद्यांतील दुबार नावांच्याबाबत कारवाई करण्यात येऊन दुबार मतदारांकडून दुबार मतदान करणार नसल्याचे संमतीपत्रे भरुन घेण्याची कारवाई करण्यात येत असल्याचे सांगितले. त्याचबरोबर आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये म्हणून सर्व राजकिय पक्षांशी संवादावर भर दिला जात आहे. तर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अधीक्षकांसोबत वेळोवेळी बैठका व संवाद करण्यात येत असल्याचे सांगितले.

तसेच सर्व पोलीस अधीक्षक यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजना, भरारी पथके, स्थिर पथके, व्हिडिओ सर्वेक्षक पथके, वॉरंट बजावणी, अवैध्य मद्य विक्री वर कारवाई व कायदासुव्यवस्थेच्या दृष्टीने सर्व उपाययोजना करण्यात येत असल्याचे सांगून मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी बंदोबस्तकामी मनुष्यबळाची उपलब्धता व आवश्यकता आदीबाबत माहितीचे संगणकिय सादरीकरण केले.

पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, नांदेड विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनीही जिल्ह्यांत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यस्था राखण्यात येत असल्याचे सांगत संवेदनशिल मतदान केंद्रे असलेल्या ठिकाणी कडेकोट बंदोबस्त लावण्यात येणार असल्याचे सांगितले. जिल्ह्यांच्या सीमा भागात नाका बंदी करण्यात येत असून करण्यात आलेल्या व करण्यात येत असलेल्या प्रतिबंधात्मक कारवाईसंदर्भात माहिती दिली. तसेच निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

# प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा;शानदार संचलन

## पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजवंदन

**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)**

देशाचा ७७वा प्रजासत्ताक दिन समारंभाचा जिल्ह्याचा मुख्य शासकीय सोहळा पोलीस आयुक्तलयाच्या देवगिरी या मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडला. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. त्यानंतर झालेल्या शानदार संचालनाने उपस्थितांच्या मनात देशभक्तीची भावना वृद्धिंगत केली.

पोलीस आयुक्तालयातील देवगिरी मैदानावर हा मुख्य शासकीय सोहळा पार पडला. विधानपरिषदेचे सदस्य आ. संजय केणेकर, माजी विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे तसेच विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे तसेच सर्व विभागप्रमुख, स्वातंत्र्य सैनिक, नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते.

पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजवंदन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत होऊन राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. राज्यगीतही सादर झाले. पालकमंत्र्यांनी परेड निरीक्षण करुन उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. आपल्या भाषणात पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, आपल्या देशात प्रजासत्ताक लोकशाहीचा अंगिकार आजच्या दिवशी झाला. विविधतेने नटलेला आपला हा देश एकतेच्या सुत्रात गुंफणाऱ्या संविधानाची महती घरोघरी पोहोचवू या. आपली लोकशाही, आपले प्रजासत्ताक बळकट करण्यासाठी सारे मिळून प्रयत्न करु. असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

विविध सन्मान- प्रजासत्ताक दिन समारंभात राष्ट्रपती पदक विजेते व पोलीस महासंचालक पदक विजेत्या पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रपती पदक विजेते- अपर पोलीस अधीक्षक किरण जितेंद्रसिंग पाटील, सहायक पोलीस उपनिरीक्षक अफजलखान शहजादेखान पठाण. केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक २०२५ पोलीस उपआयुक्त श्रीमती शर्मिष्ठा घारगे- वालावलकर, पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह २०२५, पोलीस निरीक्षक श्रीमती गीता बागवडे, अंमली पदार्थ प्रतिबंधक शाखा, पोलीस उपनिरीक्षक शेख हबीब खान, पोलीस उपनिरीक्षक दिपक सुगनसिंग परदेशी, विशेष शाखा, पोलीस उपनिरीक्षक इसाक उस्म ानखान पठाण, पोलीस उपनिरीक्षक संजय जानुजी जोगदंडे, स.पोलीस उपनिरीक्षक विष्णु लक्ष्मणराव उगले, पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रभाकर साहेबराव राऊत, संतोष गंगाराम लोढे, विठ्ठल विनायकराव मानकापे, कैलास तेजराव गाडेकर, मच्छींद्रनाथ रंगनाथ जाधव, शिवाजी राजाराम कचरे, श्रीमती दरखशा इल्तेजा रिजवान शेख, मो.इरफान मो.इसाक खान ,राजेंद्र देविदास चौधरी, लक्ष्मण दशरथ किर्तीकर, बाळासाहेब जयसिंग आंधळे, मुस्ताफ गफुर शेख, सुनिल सुरेश बेलकर, सहायक पोलीस उपनिरीक्षक दिलीप अंबादास फाटे. त्यानंतर पालकमंत्र्यांनी उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, नागरिकांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. प्रविणा कन्नडकर यांनी सुत्रसंचालन केले.

# श्री गुरुग्रंथ साहिबांचे विधीवत विराजमान



**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)**

असर्जन परिसरीतील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या मुख्य मंडपात आज श्री गुरुग्रंथ साहिबांचे अत्यंत भक्तीमय व मंगल वातावरणात विधीवत विराजमान झाले. श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर हा सोहळा पार पडला.

विराजमान प्रसंगी गुरुबाणीचे मंगल पठण, अरदास व कीर्तन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. गुरुबाणीच्या मधुर स्वरांनी संपूर्ण परिसर आध्यात्मिकतेने भारावून गेला. भाविकांनी सर्व मर्यादांचे पालन करीत शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन घेत गुरुग्रंथ साहिबांना नमन केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने नांदेड शहर व परिसरात उत्साहाचे वातावरण असून, देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांच्या स्वागतासाठी प्रशासन व विविध सामाजिक संघटनांनी आवश्यक ती तयारी पूर्ण केली आहे. भाविकांच्या सोयीसाठी दर्शन, स्वच्छता, पाणी व सुरक्षा यासह सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या बलिदानाचे स्मरण करून धर्म, मानवता व सहिष्णुतेचा संदेश देणारा हा समागम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, या कार्यक्रम ाचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जैन गूरुकुलात धार्मिक व शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)**

जैन गुरुकुल वेरूळ येथील गुरुदेव समंतभद्र विद्या मंदिर मध्ये प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. परमपूज्य १०८ आचार्य विद्यासागर म हाराज यांचे परम शिष्य निर्यापक मुनिश्री नियम सागर महाराज व सुपार्श्वसागर महाराज यांच्या मंगल आशीर्वादाने या नवीन अत्याधुनिक प्रयोगशाळेचे उद्घाटन संपन्न करण्यात येणार आहे. या निमित्ताने प्रशालेत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे यामध्ये २०२५ २६ या शैक्षणिक वर्षापासून प्रशालेत ११वी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे देखील उद्घाटन करण्यात येणार आहे. तसेच प्रशालेत सर्व सुविधांनी युक्त अशा आधुनिक विज्ञान प्रयोगशाळेचे उद्घाटन यावेळी करण्यात येणार आहे तसेच जैन त्यागी व व्रती यांच्या दृष्टीने पेय जल साठी भूमिगत एक लाख लिटर पावसाच्या पाण्याच्या साठवण दृष्टीने जलकुंभाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे

व जैन आयटीआय मध्ये दोन इलेक्ट्रिकल ट्रेड चेउद्घाटन देखील याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी प्रशालाचे वतीने विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना चालना मि ळण्याच्या दृष्टीने विविध सांस्कृतिक व कवायत कार्यक्रमाचे देखीलआयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून पार्श्वनाथ ब्रम्हचारी आश्रम जैन गुरुकुल चे अध्यक्ष दिनेश गंगवाल तर ध्वजारोहक म्हणून संस्थेचे सहमंत्री गौतमजी ठोले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात



येणार आहे. याप्रसंगी प्रमुख अतिथी पदी डॉ पी एम दरकजी , ज्योतीजी गंगवाल, महावीरजी पाटणी, प्रकाशजी गंगवाल, अमोलजी पुर्णेकर, सुयोगजी पाटोदी, देवेंद्रजी शेट्टी, प्रकाशजी पापडीवाल यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे यावेळी परमपूज्य १०८ निर्यापक मुनी नियमसागर म हाराज व सुपार्श्वसागर महाराज यांच्या मंगल प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष दिनेशजी गंगवाल, महामंत्री डॉ प्रेमचंदजी पाटणी मार्गदर्शक वर्धमानजी पांडे, सहमंत्री गौतमजी ठोले, कोषाध्यक्ष सुमितजी ठोले, शालेय समिती अध्यक्ष मदनलालजी पांडे, सदस्य निर्मल कुमारजी ठोले मुख्याध्यापक गुलाबचंदजी बोराळकर, प्राचार्य विजयजी रणनवरे, पर्यवेक्षक सुकुमारजी नवले, यांनी केले आहे अशी माहिती अतुल बांदे पियुष गंगवाल नरेंद्र अजमेरा यांनी दिली आहे.

# ‘हिंद-दी-चादर’ गुरू तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानातून मानवी मूल्यांच्या रक्षणाची प्रेरणा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



- नांदेड येथे ’हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमनिमित्त कार्यक्रमाला लाखो भाविकांची उपस्थिती
- श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानाचा इतिहास घराघरात पोहचवण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न
- श्री गुरु नानक देवजी यांच्या विचारांवर श्रद्धा ठेवणारे नऊ समाज प्रथमच लाखोंच्या संख्येने एकत्र

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

‘हिंद-दी-चादर’ गुरू तेग बहादुर साहिबजी यांचे बलिदान मानवी मूल्यांसाठी होते. त्यांचे बलिदान आपल्याला सत्य, धर्म आणि मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी निर्भीडपणे उभे राहण्याची प्रेरणा देते. त्यामुळेच त्यांचे विचार राज्यातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नांदेड येथील मोदी मैदानावर आयोजित ’हिंद दी चादर’ श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री कोनिडला पवन कल्याण, राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, नवी दिल्लीचे उद्योग, अन्न व नागरी पुरवठा मंत्री सरदार मनजिंदर सिंघ सिरसा, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ.अजित गोपछडे, खासदार डॉ. भागवत कराड, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार श्रीजया चव्हाण, आमदार जितेंद्र अंतापूरकर, आमदार रवींद्र चव्हाण, राज्य अल्पसंख्याक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, गुरूव्दारा बोर्डाचे प्रशासक डॉ.विजय सतबीर सिंघ, शहीदी समागम समितीचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गुरू तेग बहादुर साहिब जी यांनी दिलेले बलिदान हे केवळ शीख धर्मासाठी नव्हते, तर या देशाची संस्कृती, सभ्यता, विचारधारा आणि धर्म यांच्या रक्षणासाठी होते. त्यांचा पराक्रम, वीरता, शौर्य आणि सर्वोच्च बलिदानाला अभिवादन करण्यासाठी लाखोंच्या संख्येने समाज नांदेडच्या ऐतिहासिक भूमीत एकत्र आला आहे. गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या बलिदानामुळे संपूर्ण देशात धर्म, स्वातंत्र्य आणि आत्मसन्मानासाठी लढण्याची नवी चेतना निर्माण झाली. त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांपर्यंत पोहचावा, यासाठी शहीदी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून प्रत्येक गावात, वाड्या-वस्त्यांवर जावून श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास घराघरात पोहचवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शीख गुरूंचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम राज्य शासनाने हाती घेतले आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

श्री गुरु नानक देवजींना मानणारा, त्यांच्या विचारांवर श्रद्धा ठेवणारा सर्व समाज एकत्र आणण्याचा हा प्रयत्न आहे. देशाच्या विपरीत परिस्थितीत श्री गुरु नानक देवजींनी एकत्र बांधणारा, भेदाभेद नष्ट करणारा महान विचार दिला आहे. त्या विचारांनी संपूर्ण देशात विविध समाजांना जोडण्याचे काम केले. हा विचार घेवून सर्व समाजाला एकत्र आणण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाच्या माध्यमातून होत आहे. संत नामदेव महाराज हे महाराष्ट्रातील महान संत होते. त्यांची समाधी पंजाबमधील घुमान येथे आहे. संत नामदेवांनी मांडलेले विचार, त्यांचे अभंग आणि पंक्ती यांना श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये स्थान मिळाले आहे. त्यांचे विचार गुरुबाणीचा अविभाज्य भाग बनले आहेत. यामुळे महाराष्ट्रातील वारकरी परंपरा आणि शीख समाज यांच्यातील अनोखे, अतूट नाते अधिक दृढ झाले आहे. श्री गुरु गोविंद सिंघ महाराजांच्या दीर्घकाळ वास्तव्याने नांदेडची भूमी पावन झाली आहे. या भूमीने सामाजिक सलोखा अधिक मजबूत करण्याचे काम केले असल्याचा उल्लेख मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचे बलिदान हे केवळ एका धर्मापुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवी सांस्कृतिक वारशाच्या रक्षणासाठी होते.जुलमी शासकांच्या दमनकारी धोरणांविरुद्ध विचार स्वातंत्र्य आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी दिलेले गुरु तेग बहादुर जी यांचे बलिदान हे अभूतपूर्व ऐतिहासिक उदाहरण असून,त्यांच्या निर्भय आचरणातून धार्मिक व नैतिक दृढतेचा आदर्श मिळतो,असे त्यांनी सांगितले.

धर्मतत्त्वज्ञान जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी गुरु तेग बहादुर साहिब जी यांनी देशभर प्रवास करून आध्यात्मिक, सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी रचनात्मक कार्य केले. अंधश्रद्धा व अपप्रथांविरुद्ध त्यांनी प्रबोधन केले, तसेच विहिरी खोदणे, धर्मशाळा उभारणे, दानधर्म व प्राणीसेवा यांसारखी सार्वजनिक कल्याणाची कामे केली, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले.

आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी आपल्या भाषणाला मराठी भाषेत सुरुवात करत महाराष्ट्रात पुन्हा येऊन आनंद झाल्याचे सांगितले. श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या बलिदानाच्या स्मरणासाठी होणारा हा कार्यक्रम संस्मरणीय ठरेल, असे ते म्हणाले. गुरू तेग बहादूर जी यांच्या जीवनाचा आदर्श घेत युवकांनी देशाला नव्या उंचीवर घेवून जाण्याचा, तसेच देशाला अखंडीत ठेवण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इतिहासातून सामर्थ्यासोबत सद्भाव जपण्याचा संदेश महाराष्ट्राने दिला आहे, असा उल्लेखही श्री. कल्याण यांनी केला. दिल्लीचे उद्योग, अन्न व नागरी पुरवठा मंत्री सरदार मजिंदर सिंघ सिरसा म्हणाले, या समागम कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे भाग्य लाभले, याचा आनंद आहे. अतिशय भव्य कार्यक्रमाचे आयोजन राज्य शासन व नऊ समाजाच्या सहभागातून केले आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास जगासमोर आणण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा विचार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्यक्षात आणला. नांदेडच्या ऐतिहासिक भूमीत होत असलेल्या या समागम कार्यक्रमानिमित्त श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचविल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानत हा कार्यक्रम महाराष्ट्राच्या मातीतील विविध समाजाला एकत्र आणणारा ठरल्याचे त्यांनी सांगितले. संत ज्ञानी हरनाम सिंघ म्हणाले, संत नामदेव यांनी पंजाब आणि महाराष्ट्राला जोडण्याचे काम केले, त्यानंतर श्री गुरु गोविंद सिंघ यांनी महाराष्ट्रात येवून दोन्ही राज्यातील समाजाला जोडण्याचे काम केले. देशावर जेव्हा संकट आले, तेव्हा महाराष्ट्र आणि पंजाब या दोन्ही राज्यांनी शौर्य दाखविले. ज्या धार्मिक सभ्यतांसाठी श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांनी बलिदान दिले, त्या धार्मिक सभ्यता जपण्याचा, त्यांना आपल्या जीवनाचा हिस्सा बनविण्यासाठी संकल्प युवा वर्गाने करावा, असे आवाहन त्यांनी केले. शालेय अभ्यासक्रमात श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचा इतिहास समाविष्ट करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले. तसेच शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास घराघरात पोहचत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

श्री गुरु नानक देवजी यांच्या विचारांवर श्रद्धा असणाऱ्या नऊ समाजांना पहिल्यांदाच एकत्र आणून आयोजित केलेला हा कार्यक्रम समाजाला जोडणारा आहे.नऊ समाज श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्याशी जोडले गेले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यात तीन ठिकाणी होणाऱ्या शहीदी समागम कार्यक्रमांच्या निमित्ताने हे समाज पुन्हा एकत्र येत आहेत.शीख समाजाचा इतिहास शाळांमध्ये शिकवला जात आहे, ही अतिशय आनंददायी बाब असल्याचे गुरूव्दारा बोर्डाचे प्रशासक डॉ.विजय सतबीर सिंघ यांनी यावेळी सांगितले. प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री गुरू ग्रंथ साहिब जी यांचे दर्शन घेतले. तसेच यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पंच प्यारे यांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर बाबा कुलवंत सिंघ, बाबा हरनाम सिंघ, बाबा बलविंदर सिंघ यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. प्रास्ताविक अखिल भारतीय धर्म जागरण समितीचे प्रमुख शरदराव ढोले यांनी केले. शहीदी समागम कार्यक्रमाचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक यांनी आभार मानले.

---

# हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमात भाविकांची मोफत एण्डोस्कोपी तपासणी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमनिमित्त येथील मोदी मैदानावर आयोजित कार्यक्रमाला येणाऱ्या भाविकांना गॅलक्सी हेल्थ केअर चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने एण्डोस्कोपी चाचणीची सुविधा पुरविण्यात आली. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील पहिले व एकमेव फिरते एण्डोस्कोपी रुग्णालय असलेल्या गॅलक्सी हेल्थ केअर चॅरिटेबल ट्रस्टमार्फत सलग दोन दिवस हा उपक्रम राबविण्यात आला. या दोन दिवसांत मोफत तपासणी व उपचार करत सेवाभाव जपला.

डॉ. नितीन जोशी यांनी सेवाभावी वृत्ती जोपासत हा उपक्रम सुरू केला असून, ग्रामीण भागातील रुग्णांना शहरात येऊन महागड्या तपासण्या करणे शक्य नसल्याने अशा गरजू रुग्णांसाठी ही सेवा सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या संस्थेची स्थापना चार वर्षांपूर्वी झाली असून, संस्थेचा चौथा वर्धापन दिन उद्या दि. २६ जानेवारी रोजी साजरा होत आहे. मागील चार वर्षांत संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत ११८ शिबिरे आयोजित करण्यात आली असून, १५०० पेक्षा अधिक रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले आहेत.

तरुण वयात पचन संस्थेच्या गंभीर आजारांमुळे व उशिरा होणाऱ्या निदानामुळे होणारे मृत्यूचे प्रमाण कमी करणे, तसेच सामाजिक बांधिलकीतून जनसामान्यांचे जीवनमान उंचावणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे डॉ. जोशी यांनी स्पष्ट केले. पचन संस्थेतील जखमा व गाठींचे निदान बहुतांश वेळा शेवटच्या टप्प्यात होत असल्याने, प्राथमिक अवस्थेतच एण्डोस्कोपीद्वारे लवकर निदान व्हावे, यासाठी हा उपक्रम राबविला जात असल्याचे त्यांनी सांगितले. या शिबिरामध्ये डॉक्टरांची तपासणी फी, रक्त तपासणी तसेच तोंडाद्वारे एण्डोस्कोपी या सर्व सेवा पूर्णपणे मोफत देण्यात येत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

---

# ओमकार मुकबधिर निवासी विद्यालय येथे आचार्य गुप्तिनंदी गुरुदेव यांच्या आशीर्वादाने ६० गाद्यांचे वितरण

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**



धर्मतिर्थप्रनेता परमपूज्य क्रांतिकारी राष्ट्रसंत आचार्य गुप्तिनंदी यांच्या आशीर्वादाने पैठण येथील ओमकार मूक बधिर निवासी विद्यालय येथील विद्यार्थ्यांना ६० गाद्यांचे वितरण करण्यात आले यावेळी पैठण जैन मदिराचे महामंत्री विलास पहाडे क्रोषाध्यक्ष विजय पापडीवाल अभिजीत काला सुमित पाटणी स्वदेश पांडे, आदी उपस्थित होते या गादी वितरण साठी पैठण येथील सकल जैन समाज व मदिराचे अध्यक्ष महावीर बडजाते, महामंत्री विलास पहाडे ,कोषाध्यक्ष विजय पापडीवाल, विश्वस्थ जयकुमार बाकलीवाल, प्रमोद कासलीवाल,मनोज काला, प्रकाश कासलीवाल, कैलास पाटणी, किशोर भाकरे, सुमीत गंगवाल, डॉ.संजय गंगवाल, डॉ.राजेंद्र काला, स्वदेश पांडे, अभिजीत काला, विश्वस्त मंडळाचे सहकार्य मिळाला यावेळी निवासी विघालयाचे शाळेतील संस्थेचे सचिव सतीश माहोरे तसेच मुख्याध्यापिका अपर्णा गोरडे पूजा जाधव दहिफळे रमेश जाधव शिरसाठ गणेश फटांगडे मिसाळ मॅडम इत्यादी हजर होतेयाची उपस्थित होते यावेळी महा मत्री विलास पहाडे यानी आचार्य गुप्तिनंदी गूरूदेव यानी केलेल्या धार्मिक कार्यविषयी माहिती विषद केली या सामाजिक कार्याबद्दल धर्मतिर्थ चे अध्यक्ष चंद्रशेखर पाटणी मार्गदर्शक सुनिल काला वरीष्ठ उपाध्यक्ष संजय पापडीवाल, उपाध्यक्ष राजेद्र पाटणी, महामंत्री पवन पापडीवाल, सहमंत्री सतिश लोहाडे, कोषाध्यक्ष गुलाबचंद कासलीवाल यांच्यासह धर्मराजश्री तपोभुमी दिगंबर जैन ट्रस्ट धर्मतिर्थ विकास समिती कचनेर यानी अभिनंदन केले अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली.



हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199